# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 29.04.2014 (का.प.क्र. 24) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

केवळ कार्यालयीन कामकाजासाठी
कारणापुरता उतारा

**विषय क्र.231 :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरातील मलनि:सारण व्यवस्था सुधारणे आणि शहरातील विविध भागात मलजल प्रक्रीया केंद्र बांधणे बाबत केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी योजने अंतर्गत सविस्तर प्रकल्प प्रस्ताव मंजूरीसाठी केंद्र शासनाकडे दिनांक १८/२/२०१३ रोजी सादर करण्यांत आला होता. सदर प्रकल्पास दिनांक २४/१२/२०१३ रोजी केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाचे पत्र क्र. के/१४०११/१५/२०१३-युडी-१ अन्वये रुपये ३६५.६९ कोटी कामाच्या प्रस्तावास मंजूरी मिळाली.

सदर योजनेचा आर्थिक आकृतीबंध पुढील प्रमाणे आहे. यात केंद्र शासनाचा ८० टक्के हिस्सा रक्कम रुपये २९२.५५ कोटी, राज्य शासनाचा १० टक्के हिस्सा रुपये ३६.५७ कोटी व महानगरपालिकेचा १० टक्के हिस्सा रक्कम रुपये ३६.५७ कोटी अशा प्रकारे आहे. यापैकी केंद्र शासनाचा ८० टक्के हिस्सा रक्कम रुपये २९२.५५ कोटी पैकी ५० टक्के रक्कम म्हणजेच रुपये १४६.२७ कोटी मंजूर झाले असून सदर रक्कम महानगरपालिकेस लवकरच मिळेल अशी अपेक्षा आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेचा १० टक्के हिस्सा रक्कम रुपये ३६.५७ कोटी उभारणी करण्या करीता हुडको या शासकिय संस्थेने कर्ज देण्याची तयारी दर्शविली आहे. या बाबत त्यांनी महानगरपालिकेस त्यांचे पत्र क्र. एच/एमआरओ/एयुएमसी/२०१६६/२०१३, दिनांक ३१-१२-२०१३ अन्वये लेखी स्वरुपात कळविले आहे. सदरील कर्ज उभारणे बाबत औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेने त्यांचा ठराव क्रमांक ७८२ दिनांक २०/०६/२०१२ अन्वये मान्यता दिलेली आहे.

केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्पाची निविदा कार्यवाही करण्यात आली आहे. यासाठी राष्टीय पातळीवरील सर्वात जास्त खपाच्या दैनिकात तसेच सर्वाधिक खपाच्या स्थानिक वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्दीस देण्यात आली होती. तसेच सदरील निविदा सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर देखील ई-टेंडरिंग विभागा मार्फत सर्व जनतेस माहितीस्तव प्रसिध्द करण्यांत आली होती. सदर निविदा सूचना दिनांक २०/१/२०१४ रोजी प्रसिध्दीस देण्यांत आली होती. निविदा विक्रीचा कालावधी दिनांक २१/१/२०१४ ते दिनांक १७/२/२०१४ पर्यंत ठेवण्यांत आला होता. या निविदा प्रक्रीयेत एकूण १८ निविदाधारकांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले होते. त्यापैकी एकूण ११ निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या. सदर निविदाधारकां सोबत दिनांक ५/२/२०१४ रोजी निविदापूर्व बैठक घेण्यांत आली. तदनंतर निविदा दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत खालीलप्रमाणे एकूण ०४ निविदाधारकांनी दर भरलेल्या त्यांच्या निविदा ई-टेंडरिंग विभागात दाखल केल्या. सदर निविदांचे तांत्रिक मुल्यांकन करून पात्र निविदाधारकांच्या निविदा उघडण्यात आल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेचा दर |
|---|---|---|
| ०१ | खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आणि घारपुरे इंजिनियरींग अँड कंस्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (जॉईंट व्हेंचर) | रुपये ४८९.९३ कोटी (३७.९९ टक्के जास्त) |
| ०२ | लार्सन अँन्ड टुब्रो (एल अँड टी) आणि रामकी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड (जॉईंट व्हेंचर) | रुपये ५४९.०० कोटी. (५४.६३ टक्के जास्त) |
| ०३ | सिंप्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आणि युइएल (जॉईंट व्हेंचर) | तांत्रिकदृष्टया अपात्र ठरल्याने निविदा उघडली नाही. |
| ०४ | एसपीएमएल इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आणि सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड (जॉईंट व्हेंचर) | तांत्रिकदृष्टया अपात्र ठरल्याने निविदा उघडली नाही. |

वरील पैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आणि घारपुरे इंजिनियरींग अँड कंस्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (जॉईंट व्हेंचर) यांचे निविदेचे दर कमी

करण्याकरीता (दराच्या वाटाघाटीसाठी) दिनांक २१/२/२०१४, दिनांक २५/२/२०१४, दिनांक ०३/३/२०१४ आणि दिनांक २८/४/२०१४ रोजी त्यांच्या समवेत बैठका/चर्चा करण्यात आल्या. दरांच्या वाटाघाटीअंती संबंधित कंत्राटदार यांनी सदर काम रुपये ४६४.०० कोटी एवढया रकमेत करावयाचे मान्य केले. म्हणजेच त्यांनी त्यांच्या मूळ निविदा दरांपेक्षा रुपये २५.९३ कोटीची सुट दिली आहे. अशा प्रकारे त्यांनी निविदा रकमेच्या ३०.६८ टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

सदर प्रकल्प औरंगाबाद महानगरपालिकेच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचा असून जनतेचे आरोग्य चांगले राहण्याकरीता लवकरात लवकर प्रकल्प कार्यान्वित होणे आवश्यक आहे. सध्या औरंगाबाद शहरातील भूमिगत मलनि:सारण व्यवस्था मोठया प्रमाणात मोडकळीस आली असून मलजल शहरातील विविध नाल्यांमधून उघडया स्वरुपात वाहात आहे. तसेच सदर मलजलावर महानगरपालिकेतर्फे कोणत्याही प्रकारची प्रक्रिया केली जात नाही. त्यामूळे सदर दूषित पाणी हे पुढे खाम नदी वाटे आणि सुखना नदी वाटे मुख्य जलस्त्रोतात मिसळते. परिणामी महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून वारंवार कायदेशीर नोटीसा प्राप्त झाल्या आहेत. तसेच या दूषित पाण्यामूळे जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. सदर परिस्थिती पाहता या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरु होऊन मुदतीच्या आंत म्हणजेच तीन वर्षाच्या आंत पूर्ण होणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पा अंतर्गत एकूण २६० कि.मी. लांबीच्या विविध व्यासाच्या मलनि:सारण वाहिन्या टाकण्यात येणार असून शहरातील बनेवाडी (३० एमएलडी), कांचनवाडी (१३६ एमएलडी), सिध्दार्थ उद्यान (४.५० एमएलडी), पडेगांव (१० एमएलडी), झाल्टा (२० एमएलडी), सिडको (१५ एमएलडी) असे एकूण ०६ ठिकाणी २१६ एमएलडी क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्यांत येणार आहेत.

तरी निविदा दरांच्या वाटाघाटी अंती सर्वात कमी दराची खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आणि घारपुरे इंजिनियरींग अँड कंस्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (जॉइंट व्हेंचर) यांची रक्कम रूपये ४६४.०० कोटीची (३०.६८ टक्के जास्त दराची) निविदा विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहरातील मलनि:सारण व्यवस्था सुधारणे आणि विविध भागात मलजल प्रक्रीया केंद्र बांधणेचा प्रकल्प औरंगाबाद महानगरपालिकेच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचा असून जनतेचे आरोग्य चांगले राहण्याकरीता लवकरात लवकर प्रकल्प कार्यान्वित होणे आवश्यक असल्याने, औरंगाबाद शहरातील मलनि:सारण व्यवस्था सुधारणे आणि शहरातील विविध भागात मलजल प्रक्रीया केंद्र बांधणेच्या प्रकल्पांतर्गत एकूण २६० कि.मी. लांबीच्या विविध व्यासाच्या मलनि:सारण वाहिन्या टाकणे, तसेच बनेवाडी (३० एमएलडी), कांचनवाडी (१३६ एमएलडी), सिध्दार्थ उद्यान (४.५० एमएलडी), पडेगांव (१० एमएलडी), झाल्टा (२० एमएलडी), सिडको (१५ एमएलडी) असे एकूण ०६ ठिकाणी २१६ एमएलडी क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र उभारणे या कामांसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आणि घारपुरे इंजिनियरींग अँड कंस्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (जॉईंट व्हेंचर) यांचेशी झालेल्या दरांच्या वाटाघाटीअंती संबंधित कंत्राटदार यांनी संमती दिल्यानुसार सदर काम त्यांचेकडून रुपये ४६४.०० कोटी रक्कमेच्या मर्यादेत म्हणजेच निविदा रकमेच्या ३०.६८ टक्के जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

~~सभापती स्थायी समिती~~
महानगरपालिका औरंगाबाद